माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००९३७/२०/अ. क्र. ६०९/२३/०१**

**श्री. मोहन विठोबा लोकेगांवकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) द के/पश्चिम विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
दुसरा मजला, बी.ई.एस.टी.डेपोसमोर, पालीराम पथ, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता के/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
दुसरा मजला, बी.ई.एस.टी.डेपोसमोर, पालीराम पथ, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२३**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०८.२०१९ | १९.०९.२०१९ | १६.०९.२०१९ | २९.११.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २५.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे :-

"प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना मी दि. ०९.०८.२०१९ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन दि. १५.११.२०१९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने अर्जात नमूद बाबी बाबत सखोल माहिती घेऊन सदर फाईल अ अथवा व वर्गवारीत असल्यास त्या दस्तऐवजाचा कसून शोध घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी – असे स्पष्ट आदेश दिलेले असताना आजमितीपर्यत कोणतीही माहिती अथवा स्पष्टीकरण अद्याप देण्यात आलेले नाही. म्हणून दुसरे अपील सादर."

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ०९.०८.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"मौजे जुहू, नगरभूमापन क्र. १०४९ अ, या प्रॉपर्टीकार्डमधील डिवाईड होऊन नगरभूमापन क्र. १०४९अ/७८ या प्रॉपर्टीमधील चंद्राबाई नगर, जुहू रोड, जुहू कोळीवाडा बस स्टॉपच्या शेजारी, सांताक्रुझ (प.) मुंबई – ४०००४९ येथील मा. सहाय्यक अभियंता (परिरक्षण व सेट बॅक) के/पश्चिम विभाग, मुंबई मनपा यांचेकडील पत्र क्र. K/AEM/SB/10715 दि. ०१.०२.९३ या नस्तीचे निरिक्षण होऊन झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन मिळणेकरिता."

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १९.०९.२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २९.११.२०१९ संलग्न केले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १९.०९.२०१९ अन्वये अपीलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे :-

"उपरोक्त संदर्भानुसार, आपण माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती करिता केलेला अर्ज क्र. २४५८ या कार्यालयाला दि. ०९.०८.२०१९ रोजी व जन माहिती अधिकारी यांना दि. १४.०८.२०१९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आपल्या माहिती अर्जामध्ये उल्लेखलेल्या ठिकाणी सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे."

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे शेरे नोंदवून दि. २९.११.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

"अपिलकर्ता यांनी दि. १६.०९.२०१९ च्या अपिल अर्जात नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी अद्याप कोणतीही माहिती अथवा उत्तर दिलेले नाही. सदर सुनावणी अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्त्यास क्रमांक केप/२४५८/सअप अन्वये दि. २०.०९.२०१९ रोजी माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जास उत्तर देण्यात आलेले आहे. अपिलकर्त्याने दि. १६.०९.२०१९ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी के/प. विभाग कार्यालयाच्या दुस-या मजल्यावरील विभाग कार्यकारी अभियंता, के/पश्चिम यांच्या दालनात दि. ०१.११.२०१९ रोजी स. ११.३० वाजता ठेवण्यात आली होती. परंतु आपण दि. ३१.१०.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंती अर्जास अनुसरुन सदरची सुनावणी रद्द करुन दि. १५.११.२०१९ रोजी ठेवण्यात आली. सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हवी असलेली माहिती या खात्यामध्ये उपलब्ध नाही असे मोघम उत्तर दिलेले आहे. परंतु शासन/मनपा नियमावली नुसार सदर दस्तऐवजाची विल्हेवाट लावण्यात आली याबाबत काहीही स्पष्ट केले नाही. तरी त्यांनी हवी असलेली माहिती "अ" वर्गवारीमध्ये समाविष्ट असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ती कायमस्वरुपी जतन करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने अर्जात नमूद बाबी बाबत सखोल माहिती घेऊन सदर फाईल "अ" अथवा "ब" वर्गवारीत असल्यास त्या दस्तऐवजाचा कसून शोध घेऊप अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी."

सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थींना दिल्याचे दिसून येत नाही. या कारणामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना १५ दिवसांत नि:शुल्क पाठविण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २२.०३.२०२३**

State Information Commission

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**